**प्रेस नोट**

**विषय** :- पोलीस अधिकारी/कर्मचारी, निवृत्त झालेले कर्मचारी यांचे मुलां-मुलीकरीता, त्यांचे नातेवाईकाकरीता रोजगार उपलब्ध करुन देणेकामी रोजगार मेळावा.

---ooo---

पोलीस आयुक्तालय, पुणे शहर व मॅनपॉवर ग्रुप करिअर फेस्ट यांचे संयुक्त विद्यमानाने दि.०३/०२/२०१८ रोजी व दि.०४/०२/२०१८ रोजी सकाळी ०९.३० ते ०५.०० वा. पोलीस मुख्यालय, शिवाजीनगर, पुणे येथे पोलीस अधिकारी/कर्मचारी, निवृत्त झालेले कर्मचारी यांचे मुलां-मुलीकरीता, व त्यांचे नातेवाईकांकरीता रोजगार उपलब्ध करुन देणेकामी रोजगार मेळावा आयोजित करण्यात आलेला आहे

दिनांक ०३/०२/२०१८ रोजी मा. रश्मि शुक्ला पोलीस आयुक्त पुणे शहर यांचे शुभहस्ते पोलीस मुख्यालय शिवाजीनगर येथे सदर रोजगार मेळावा कार्यक्रमाचे उद्‌घाटन करण्यात आले. सदर उद्‌घाटनप्रसंगी सह पोलीस आयुक्त श्री. रविंद्र कदम पुणे शहर, मॅनपॉवर ग्रुपचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. ए. जी राव, अध्यक्ष श्री मनमीत सिंग, तसेच इतर पदाधिकारी व कर्मचारी उदघाटन प्रसंगी हजर होते.

दिप प्रज्वलन करून सदर कार्यक्रमास सुरूवात झाली. सदर कार्यक्रमास पहिल्याच दिवशी ५५० ते ६०० पोलीस अधिकारी व कर्मचारी यांची मुले मुली या नोकरीच्या संधी मिळण्याकरीता हजर होत्या. तसेच नोकरीची संधी उपलब्ध करून देणारे पुण्यातील ३५ विविध आयटी, बीपीओ, केपीओ, रिटेल, टेलीकम्युनिकेशन क्षेत्रात कार्यरत असलेल्या कंपनीचे प्रतिनीधी हजर होते.

सदर कार्यक्रमास नोकरी/व्यवसाय संधीसंबंधाने सदर क्षेत्रातील मान्यवर व्यक्तींनी मार्गदर्शन केले. तसेच नोकरी/व्यवसाय मिळणेकरीता हजर असलेल्या मुलामुलींचा शैक्षणिक पात्रता, व्यावसायिक योग्यता या संबंधाने हजर असलेल्या कंपनी प्रतिनिधींनी माहिती घेण्याचे काम चालु आहे. सदर कार्यक्रम २ दिवस चालणार आहे.

सदर मॅनपॉवर ग्रुप ऑफ इंडीया हे राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरील विविध कंपन्याना आवश्यक असणारे मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याकरीता मध्यस्त म्हणून तसेच नवीन उद्योग व्यवसाय यांना मनुष्यबळ प्रशिक्षित करणे व उपलब्ध करून देणे अशाप्रकारची कामे जबाबदारीने व मेहनतीने पार पाडत आहेत. या अगोदर सन २०१७ मध्ये सदरचा कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला होता.


मॅनपॉवरग्रुप करिअर फेस्ट - २०१८
पुणे पोलीस